युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना.
निधी वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : निवियो-२०१८/प्र.क्र.१४५ /क्रीयुसे -३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०७ मार्च, २०१९.

वाचा :-

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. युकयो-२०१२/प्र.क्र.६३/क्रीयुसे-३, दि. १२ नोव्हेंबर, २०१३
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५ जानेवारी, २०१९.
३. क्रीडा व युवक सेवा पुणे यांचे पत्र क्र.निधी वितरण/योजना-५५३७/२०१८-१९/का-१०/ ६४०३ दि.२१ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना :-

सामाजिक निर्णय प्रक्रीया, संघटनात्मक नियोजन व शैक्षणिक सुधारणा या युवा सक्षमीकरणाच्या महत्वाच्या घटकांद्वारे समाजाचा पाया शक्तीशाली होवून पुढील पिढीकरीता चांगले आदर्श निर्माण होऊ शकतील. सेवाभावी युवा नेतृत्व त्याचप्रमाणे युवांना आधुनिक तंत्रज्ञानाचे सहाय्याने उत्साही, आनंदी, तणावमुक्त व जबाबदार आयुष्य जगण्याकरीता व या स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून पुढे आणण्याच्या दृष्टीने शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.युकयो-२०१२/प्र.क्र.६३/क्रीयुसे-३, दि.१२ नोव्हेंबर, २०१३ अन्वये युवा प्रशिक्षण केद्राची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पिय तरतूद रु.८०.०० लक्ष मधुन वित्त विभागाच्या दि. २/४/२०१८ च्या शासन परिपत्रकानुसार ७०% च्या मर्यादेत रु.५६.०० लक्ष इतक्या निधीच्या वितरणास शासन निर्णय क्र.निवियो-२०१८/प्र.क्र.१४५/क्रीयुसे-३ दि.०३/११/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. वित्त विभागाच्या दि. २५/१/२०१९ च्या शासन परिपत्रकानुसार उर्वरीत १०% च्या मर्यादेतील रु.८.०० लक्ष (रु.आठ लक्ष फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब या नस्तीच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करुन देऊन या स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून पुढे आणण्याच्या उद्देशाने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात निधीच्या उपलब्धतेनुसार ४० प्रशिक्षण शिबिरे आयोजित करावीत. ही प्रशिक्षण शिबिरे प्रत्येक विभागास ५ याप्रमाणे ८ विभागाच्या ठिकाणी अथवा युवा प्रशिक्षण केंद्र, बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यांस या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु.८०.०० लक्ष एवढया निधीपैकी ७०% च्या मर्यादेत रु.५६.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत १०% च्या मर्यादेतील रु.८.०० लक्ष (रु.आठ लक्ष फक्त) इतका निधी वितरीत करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्रमांक : ई-३, २२०४ क्रीडा व युवक सेवा-१०३,विद्यार्थीत्तर युवकांसाठी युवक कल्याण कार्यक्रम, (१०)(०९) युवा धोरणातंर्गत युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना (कार्यक्रम) (२२०४ ५५३७) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. वित्त विभागाच्या दि. २५/१/२०१९ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (क्रीडा) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.०२/०४/२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांना अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमुद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्र.१,२,३,४,५,६ व ७ मधील बाबी सदर आदेशास लागू नाहीत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१११२२२०७०६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.11 12:25:50 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव
२) मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
५) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
६) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
७) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत)
८) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
९) वरीष्ठ कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, पुणे.
१०) निवड नस्ती, क्रीयुसे-३